# मेट्रो – ३ : सिव्हिल वर्कसाठी पाच कंत्राटदार नियुक्त

▮ मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मार्गाच्या विविध कामकाजासाठी पाच कंत्राटदारांची निवड करण्यात आली असून यामुळे प्रकल्प कामकाजाला वेग मिळाला आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या ३३.५ किमीच्या भुयारी मार्गासाठी १८,११४.९ कोटी रुपये प्रकल्प खर्च दाखवण्यात आला आहे. प्रकल्पातील विविध बांधकामांसाठी ७ पॅकेज तयार करण्यात आली असून जागतिक दर्जाच्या कंपन्यांसोबत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. मेट्रो ३साठी एमएमआरसीने ८३ टक्के जमीन संपादन केली आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिके दरम्यान २७ स्थानके असून जापनीज बँकेकडून अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. केंद्राकडून या प्रकल्पासाठी तफावत निधी उपलब्ध होणार आहे. जापनीज बँकेकडून करण्यात आलेल्या निर्देशानुसारच सिव्हिल वर्क कंत्राटदारांची नेमणूक आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेनुसार अर्थात आयसीबीनुसार करण्यात आली आहे. मुंबई शहर आणि पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या विभागांमध्ये औद्योगिक विभाग ते नरिमन पॉइंटपर्यंतचा विकास साधण्यात येणार आहे. वांद्रे, कुर्ला संकुल, सीप्झ, काळबादेवी, वरळी, प्रभादेवी, अंधेरी-पूर्व या विभागांचा या मार्गिकेदरम्यान समावेश आहे.

मेट्रो ३ प्रकल्पाच्या माध्यमातून पश्चिम रेल्वे, मध्य रेल्वे आणि मोनोरेल, मेट्रो १ मार्गिकेशी इंटरचेंज सुविधा मिळणार आहे तसेच आरामदायी प्रवासासाठी मेट्रो २ सोबत मेट्रो ३ जोडले जाणार असून २०२१ पर्यंत १४ लाख प्रवासी प्रवास करतील, अशी अपेक्षा आहे. मेट्रो ३ च्या नियोजनातच प्लॅटफॉर्म दरवाजे, स्वयंचलित भाडे आकारणीच्या आधुनिक डब्यामुळे २.५ मिनिटांनी ट्रेन्स धावणे शक्य होणार आहे.

- मे. एल ॲण्ड टी, एसटीईसी पॅकेज १ : २९८८.५३ कोटी : कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक स्थानके
- मे. एचसीसी – एमएमएस पॅकेज २ : २५२१.८९ कोटी : सीएसटी मेट्रो, काळबादेवी, गिरगाव, ग्रॅण्ट रोड स्थानके
- मे. डोगस सोमा पॅकेज ३ : २५५७.८४ कोटी : महालक्ष्मी मेट्रो, मुंबई सेंट्रल, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे व वरळी स्थानके
- मे. सीएसी – आयटीडीसीएम – टीपीएल – पॅकेज ४ : २८३०.१० कोटी : सिद्धिविनायक, दादर मेट्रो, शीतलादेवी स्थानके
- मे. जे कुमार सीआरटीजी : पॅकेज ५ : २८८१७.०२ कोटी : धारावी, बीकेसी मेट्रो, विद्यानगरी, सांताक्रुझ स्थानके
- मे. जे कुमार सीआरटीजी : पॅकेज ६ : २११८.४० कोटी : छत्रपती शिवाजी एअरपोर्ट, सहार रोड स्थानके
- मे. एल ॲण्ड टी एसटीईसी पॅकेज ७ : २२८१.४५ कोटी रुपये : मरोळ नाका, एमआयडीसी, सीप्झ स्थानके



- मेट्रो ३ मुळे वायू व ध्वनी प्रदूषणात घट
- वाहतूक कोंडीमध्ये घट
- २४३३९० लिटर इंधनाची बचत
- १५.८१ कोटी रुपयांची बचत
- कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन नियंत्रणात आणण्यासाठी फायदेशीर